# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

गोवर्धन ,गंगापूर धरणाजवळ ,नाशिक 422 222


जा.क्र./कुलसचिव/ /२०१८

दिनांक: २२/०६/२०१८

## YCMOU STAND UP SCHEME (YSUS)

## मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकडून रोप खरेदी

## सूचना

मुक्त विद्यापीठाच्या कृषि विज्ञान केंद्राच्या रोपवाटीकेमध्ये आंबा कलमे तयार करण्यासाठी रायवळ आंबा रोपे खरेदी करणे प्रस्तावित आहे. सदर रोपे ही विद्यापीठाच्या कृविकेद्वारा रोपवाटिका तंत्र प्रशिक्षित युवक/ कृषी व उद्यान विद्या यातील पदविका किंवा पदवीधारकांकडूनच खरेदी करणे प्रस्तावित आहे. सदर रायवळ आंबा रुजलेले रोप रु.१२ प्रति नगाप्रमाणे रोपवाटिकेत पोहोच करणे या अटीवर खरेदी करण्यात येतील. एका विद्यार्थ्याकडून किमान ५००० आणि कमाल १५००० रोपे खरेदी करण्यात येतील. तरी इच्छुक विद्यार्थी/ प्रशिक्षण घेतलेले युवक/युवती यांनी कृविकेस दिनांक ९/७/२०१८ पर्यंत अर्ज करावा.

तसेच आंबा कोय कलम रु.७/- प्रती यशस्वी जिवंत कलम या दराने कृविके रोपवाटिकेतच करावयाची असून त्याचा देखील उल्लेख करावा व पुरवठ्याबाबत सहमती यास अर्ज करावा. या पुरवठ्याची आणि कलम कामाच्या यशस्वी जिवंत रोपांची मोजणी करूनच दोन्ही बिलाची रक्कम स्वतंत्रपणे संबंधितास चेकद्वारा अथवा बँकेत ट्रान्सफर करण्यात येईल.

### रायवळ आंबा रोपे पुरवठा आणि कलम करणे यासाठी अटी व शर्थी

1) या कामास प्रथम येईल त्यास प्रथम काम या तत्वावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

2) पुरवठादार व्यक्ती मुक्त विद्यापीठ पदविका/पदवीधर/ कृविकेत रोपवाटिका प्रशिक्षण घेतलेली असावी.

3) साधारण १,००,००० ( एक लाख) रायवळ आंबा रोपे खरेदी करणे प्रस्तावित आहे.

4) इच्छुक व्यक्ती/विद्यार्थ्याने कोऱ्या कागदावर सोबतच्या नमुन्यांनुसार सदर पुरवठा आणि कलम काम करण्यास कुलसचिव,**य.च.म.मु.वि., नाशिक यांचे नावे, दि. ९/७/२०१८ पर्यंत पुरवठ्यास व कलम करण्यास अर्ज करावा**. रायवळ आंबा रोपे पुरवठा आणि कलम करणे यासाठी स्वतंत्र अर्ज करता येतील. अर्ज स्वीकारल्या नंतर त्यांची छाननी करून पात्र व्यक्तींना/विद्यार्थ्यांना रोपे पुरवठ्याचे/कलम करण्याचे पत्र देण्यात येईल. त्यानुसार त्यांनी पुरवठ्याचे/कलम करण्याचे काम करणे बंधनकारक राहील.


कुलसचिव कार्यालय
आवक क्र.: 1365
दिनांक: 30/06/2018

5) अर्जासोबत मुक्त विद्यापीठाच्या पुढील पैकी कोणतीही एक पदविका/ पदवी पूर्ण केली असल्यास, उदा. कृषी/उद्यानविद्या पदवी /माळी प्रशिक्षण/फळबाग/भाजीपाला/फुलशेती/ कृविकेच्या रोपवाटिका व्यवस्थापन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रमाणपत्राची फोटोप्रत जोडावी.

6) अर्जासोबत आधारकार्ड, बँक खाते तपशील तसेच रहिवाशी पुरावा (विज बिल/फोन बिल प्रत) जोडणे आवश्यक आहे.

7) सदर रोपे हे "६x९" इंच किंवा "७x९" इंच आकाराच्या नर्सरी बॅगमध्ये लावलेले असावे.

8) यासाठी वापरण्यात येणाऱ्या माध्यमांमध्ये लाल माती किंवा पोयटा माती सोबत सुपर फॉस्फेट व शेणखत यांचे मिश्रणअसणे गरजेचे आहे. सदर रोपे हि कलम करणे योग्य आकाराची व वयोमानाची असली पाहिजेत.

9) **रायवळ आंबा रुजलेले रोप रु.१२/- प्रति नगाप्रमाणे** रोपवाटिकेत पोहोच करणे आवश्यक आहे. सबंधीतास दिलेल्या आदेशानुसार प्रक्षेत्र व्यवस्थापक हे आंबा रुजलेले रोप यांची गणती, नोंद आणि त्यांचे बिल प्रमाणित करून करून वित्त विभागामार्फत चेक अथवा बँकेत ट्रान्सफर द्वारा अदा करण्यात येईल.

10) आंबा कोय कलम **कृविके रोपवाटिकेतच करावयाची** असून **रु.७/- या दराने** रक्कम प्रती यशस्वी जिवंत कलम मोजणी करून अदा करण्यात येईल. सबंधीतास दिलेल्या आदेशानुसार प्रक्षेत्र व्यवस्थापक हे आंबा यशस्वी जिवंत कलम यांची गणती, नोंद आणि त्यांचे बिल प्रमाणित करून करून वित्त विभागामार्फत चेक अथवा बँकेत ट्रान्सफर द्वारा अदा करण्यात येईल.

11) सदर कामाच्या बाबतीत काही सुधारणा, बदल करणे आणि काम स्वीकारणे अथवा नाकारणे या बाबतचे संपूर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

**कुलसचिव**